# विभागीय कृषि सहसंचालक नाशिक.विभाग नाशिक कार्यालय

*अश्विनी बॅरेक्स, विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाशेजारी, नाशिकरोड - ४२२१०१*

दुरध्वनी क्र.०२५३-२४६८३६१/६२ ई-मेल-jdanskest@gmail.com


## कृषि सेवक भरती-२०१९ तात्पुरती अंतरीम गुणवत्ता यादीबाबत

## -: निवेदन :-

नाशिक विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरतीकरीता जाहिरात क्रमांक विकृसस/ नाशिक/आस्था-३ /जाहिरात/२०१८-१९/१४ नाशिक दिनांक ०३/०१/२०१९ नुसार दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०१९ रोजी महा ऑनलाईन व्दारे विविध केंद्रावर परिक्षा घेण्यात आली होती. त्या परिक्षेच्या अनुषंगाने महापरिक्षा कक्षाकडून प्राप्त झालेली नाशिक संभागातील उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी व अनूसूचित क्षेत्रातील गुणवत्ता यादी कृषि विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक २६/०८/२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तथापि सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत काही उमेदवारांचे लेखी तसेच दूरध्वनीव्दारे आक्षेप या कार्यालयांस प्राप्त झाले होते. याबाबत अशा प्रकारच्या तक्रारी इतर विभागाकडूनही प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने महापरिक्षा कक्षाकडे वरीष्ठ कार्यालयाने संपर्क साधून कळविले असता, तद्नंतर महापरिक्षा कक्षाकडून कृषि सेवक परिक्षेस बसलेल्या उमेदवारांच्या गुणांकन यादीबाबतच्या प्राप्त सुधारीत सी.डी.च्या आधारे तात्पुरती अंतरिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी पुनःश्च कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता याद्या रद्द समजण्यात याव्यात.

सदर यादीबाबत उमेदवारांना काही आक्षेप असल्यांस त्यांनी दिनांक १७/०९/२०१९ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत आक्षेप अर्ज आधारभूत कागदपत्रांसह *विभागीय कृषि सहसंचालक नाशिक, अश्विनी बॅरेक्स, विभागीय महसूल आयुक्त कार्यालयाशेजारी, नाशिकरोड - ४२२१०१* या कार्यालयांस प्रत्यक्ष किंवा jdanskest@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

स्थळ:- नाशिकरोड-४२२१०१.
दिनांक:- १३ सप्टेंबर २०१९

(संजीव गोवर्धन पडवळ)
विभागीय कृषि सहसंचालक
नाशिक विभाग नाशिक